गुरुवार, दि. २४ जुलै २०२५ ● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ३४९ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## रमी सर्कल प्रकरणावरुन शरद पवार गट आक्रमक : कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांची हकालपट्टी करण्याची मागणी

### जालना राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट)कडून जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** राज्याचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांचा अधिवेशनादरम्यान रम्मी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्याने राज्याच्या राजकारणात खळबळ उडाली आहे. या प्रकरणावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आक्रमक झाला असून मुख्यमंत्र्यांकडे कोकाटे यांची मंत्रिमंडळातून तात्काळ हकालपट्टी करण्याची मागणी करण्यात आली आहे. बुधवार (दिनांक २३) रोजी दुपारी एक वाजता शरद पवार गटाच्या पदाधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात भेट देत मुख्यमंत्र्यांना संबोधित निवेदन सादर केले. या निवेदनात कोकाटे यांचे विवादास्पद विधान, दादागिरी, शेतकऱ्यांप्रती वापरलेली अर्वाच्च भाषा, आणि अधिवेशनाच्या दरम्यान रमी सर्कल गेम खेळल्याचा व्हिडिओ या सर्व बाबी नमूद करण्यात आल्या आहेत.

**निवेदनातील मुख्य मुद्दे :** कोकाटे यांनी वारंवार शेतकऱ्यांविषयी **पान २ वर**



# महावितरणच्या निष्काळजीपणाचा बळी!

### आमदार लोणीकर यांनी घेतली भालेकर कुटुंबाची भेट घेत धीर दिला

## दोषींच्या निलंबनावर आमदार लोणीकर ठाम

**परतूर । प्रतिनिधी -** तालुक्यातील शेतकरी संदीप भालेकर यांच्या शेतात महावितरणच्या निष्काळजीपणामुळे विजेच्या अस्ताव्यस्त तारांमुळे शॉक लागून त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेने परिसरात खळबळ माजली असून, महावितरणच्या गलथान कारभारावर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शेतकऱ्यांनी यापूर्वी वीजतारांच्या दुरवस्थेबाबत महावितरणच्या कर्मचाऱ्यांना वारंवार माहिती दिली होती, परंतु कोणतीही दखल घेतली गेली नाही, ज्यामुळे ही दुखद घटना घडली.

या घटनेची माहिती मिळताच महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री आणि परतूर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनराव लोणीकर यांनी तातडीने पावले उचलली. त्यांनी महावितरणचे कार्यकारी अभियंता श्री. मठपती यांच्याशी संपर्क साधून या प्रकरणातील दोषी कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी केली. तसेच, भविष्यात अशा दुर्घटना **पान २ वर**



# राशन वितरणात अडथळे; सर्व्हर सुधारा

### शिवराष्ट्र संघटनेचे निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** मागील आठवड्यापासून जिल्ह्यातील विशेषतः ग्रामीण भागातील शासकीय राशन दुकानांचे सर्व्हर वारंवार बंद राहत असल्याने ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर शिवराष्ट्र संघटनेच्या वतीने भरत मानकर यांनी आज जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देत तात्काळ उपाययोजनांची मागणी केली.

ग्रामीण भागातील नागरिक रेशन दुकानावर अनेक वेळा फेऱ्या मारूनही धान्य मिळत नसल्याने नाराजी व्यक्त करत आहेत. ई-पॉस मशिन वारंवार बंद होत असल्याने लाभार्थ्यांना ताटकळत रांगेत थांबावे लागत आहे. कधी-कधी मशीन पूर्णपणे बंद राहते आणि धान्य वितरण थांबते, यामुळे दुकानदारांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे.



भरत मानकर यांनी प्रशासनाला इशारा दिला की, जर पुरवठा विभागाने त्वरीत सर्व्हर सुधारणा व आवश्यक उपाययोजना केल्या नाहीत, तर शिवराष्ट्र संघटना तीव्र आंदोलन छेडेल.

तत्पुर्वी भरत मानकर यांनी बुधवार (दिनांक २३) रोजी दुपारी एक वाजेदरम्यान जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन सदर समस्या स्पष्टपणे मांडली.

युवा आदर्श

## गतहारी ...

गतहारी अमावस्या
पवित्र असते खरी
दिवे समया लख्ख
पुजा चाले घरोघरी
अमावस्या बदनाम
कुणी बोले रे गटारी
अभक्ष भक्षण करी
मद्यधुंद रात्र साजरी
कृष्ण कृत्ये स्मशानी
करती काही अघोरी
भयभीत करे लोकां
भरे आपली तिजोरी
दिवस रे प्रकाशमान
रात्र नेहमीचं अंधारी
पट्टी बांधी डोळ्यांस
असते कुणी गांधारी
अंधश्रध्दा भारलेली
मनोॠग्णां आजारी
मनात भरायला भय
असती नित शेजारी
सावजा पकडायला
टपून बसले शिकारी
फूस लावती नतद्रष्ट
आवाज देती हाकारी
चंद्र अन् मंगळावारी
आम्ही करी नित्यवारी
विश्वास ठेवतो कसा
मग भाकड कथेवरी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्यात ७५ उमेदवारांची निवड

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, जालना अणि मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, भोकरदन जि. जालना यांचे संयुक्त विद्यमाने मंगळवार दि २२ जुलै, २०२५ रोजी मोरेश्वर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भोकरदन जि. जालना येथे पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा संपन्न झाला. या रोजगार मेळाव्यात एकुण २५९ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी १४४ उमेदवार प्रत्यक्ष मुलाखतीस सहभागी झाले होते. यामध्ये १२१ पुरुष तर २३ महिलांचा समावेश आहे. या रोजगार मेळाव्यात परीसरातील एकुण ७५ उमेदवारांची विविध पदांसाठी आस्थापनांव्दारे प्राथमिक निवड करण्यात आली. यामध्ये छत्रपती संभाजीनगर व **पान २ वर**

# नियम डावलून झालेली निवडणूक रद्द करा; सभासदांची सहकार आयुक्तांकडे मागणी

### सागर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थेच्या निवडणुकीवर बहिष्कार, फेरनिवडणुकीची मागणी

**परतूर । प्रतिनिधी -** सागर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्या. परतूर (जि. जालना) येथे पार पडलेली निवडणूक नियमबाह्य पद्धतीने झाल्याचा आरोप करत, संस्थेच्या सभासदांनी सहकार आयुक्तांकडे लेखी निवेदनाद्वारे निवडणूक रद्द करून फेर निवडणूक घेण्याची जोरदार मागणी केली आहे.

सभासदांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निवडणूक प्रक्रियेतील वेळापत्रक ठरले असतानाही, संबंधित निवडणूक अधिकारी श्री. आ.सा. गुसिंगे आणि बी.टी. लिंगायत यांनी दुपारी तीननंतर मतदान सुरू करून संपूर्ण प्रक्रिया नियमबाह्य पार पाडली. हा निवडणूक गैरप्रकार असून त्यामागे लाखो रुपयांची आर्थिक देवाणघेवाण झाली असल्याचा आरोप सभासदांनी केला आहे.

निवेदनात निवडणूक प्रक्रियेतील वेळापत्रकही स्पष्ट करण्यात आले असून, सकाळी १०.३० पासून ते दुपारी १.१५ पर्यंत प्रक्रिया पार पाडली जाणे अपेक्षित असताना, दुपारी ३ वाजेच्या नंतर मतदान घेण्यात आल्याने ती एकतर्फी निवडणूक ठरली असल्याचे म्हटले आहे.

सभासदांनी या निवडणुकीवर बहिष्कार टाकला असून, जर निवडणूक रद्द करून पुन्हा प्रक्रिया राबविण्यात आली नाही, तर जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला आहे.

**सभासद सागर काजळे यांनी दिली प्रतिक्रिया:** निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी जवळपास **पान २ वर**





# संपादकीय

## सच्चे रंगकर्मी

मराठी चित्रपट आणि नाट्य सृष्टीतील जेष्ठ अभिनेते जयंत सावरकर यांचा आज दुसरा स्मृतिदिन. बरोबर एक वर्षापूर्वी म्हणजे २४ जुलै २०२३ रोजी त्यांचे वृद्धपकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी निधन झाले होते. जवळपास पाच दशकांहून अधिक काळ रंगभूमीवर आपल्या अभिनयाचे रंग भरणाऱ्या जयंत सावरकर यांच्या निधनाने मराठी रंगभूमीची मोठी हानी झाली. त्यांच्या निधनाने रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला. ३ मे १९३६ रोजी रत्नागिरी जिल्ह्यातील गुहागर तालुक्यात जन्मलेले जयंत सावरकर हे नोकरीसाठी मुंबईत आले. काही काळ त्यांनी मुंबईत नोकरीही केली मात्र अभिनयाचे बाळकडू पिलेल्या जयंत सावरकर यांचे मन नोकरीत रमले नाही. नोकरी सोडून ते नाटकात काम करू लागले. नोकरी सोडून त्यांनी नाटकात काम करणे हे त्यांच्या सासऱ्यांना आवडले नाही. जयंत सावरकर मात्र अभिनय करण्यावर ठाम राहिले. रंगभूमीवर त्यांना जी भूमिका मिळत गेली ती त्यांनी निष्ठेने पूर्ण केली. सुरवातीचे काही वर्ष तर त्यांनी बॅक स्टेज आर्टिस्ट म्हणूनच काम केले मात्र आपल्यालाही आपल्या क्षमतेप्रमाणे नाटकात अभिनय करण्याची संधी मिळेल असा विश्वास त्यांना होता याच विश्वासाच्या जोरावर त्यांना भूमिका मिळत गेल्या. आपल्याला मिळणाऱ्या भूमिकांची लांबी किती मोठी आहे हे त्यांनी कधीही पाहिले नाही. जयंतराव भूमिकेच्या लांबीपेक्षा भूमिकेची रुंदी पाहत म्हणूनच त्यांना काही नाटकात छोट्या भूमिका मिळाल्या मात्र या छोट्या भूमिकेतही त्यांनी स्वतःच्या अभिनयाची छाप सोडली त्यामुळे लवकरच मराठी रांगभूमिवरील एक प्रख्यात अभिनेते म्हणून ओळखले जाऊ लागले. पुढे त्यांना अनेक नाटकात मुख्य भूमिका मिळाल्या त्या भूमिकांचे त्यांनी सोने केले. एकच प्याला मधील तळीराम, तुझं आहे तुझ्यापाशी मधील आचार्य, व्यक्ती आणि वल्ली मधील अंतु बर्वा आणि हरितात्या या त्यांनी केलेल्या भूमिका अजरामर ठरल्या. जुन्या काळातील मामा पेंडसे, केशवराव दाते, दत्ताराम यांच्यापासून ते आजच्या काळातील चंद्रकांत कुलकर्णी, मंगेश कदम यासारख्या सर्वच दिग्दर्शकांच्या दिग्दर्शनात त्यांनी काम केले. त्यांनी अभिनय केलेले सौजण्याची ऐसीतैशी, टिळक - आगरकर, ययाती - देवयानी, सूर्यास्त ही नाटके खूप गाजली जवळपास १०० हुन अधिक नाटकात भूमिका केलेल्या जयंतरावांनी ३० हुन अधिक मराठी आणि हिंदी चित्रपटात भूमिका केल्या आहेत. दूरचित्रवाणीवरील काही मालिकातही त्यांनी भूमिका केल्या आहे. नाटक, चित्रपट, मालिका अशा तिन्ही ठिकाणी आपल्या अभिनयाचे रंग भरणारे जयंतराव मात्र प्रेक्षकांना भावले ते नातकातच! सहज सोपा अभिनय करून प्रेक्षकांची मने जिंकण्याची त्यांची खासियत होती म्हणूनच त्यांचा अभिनय पाहताना हा माणूस आपल्या घरातीलच एक व्यक्ती असल्याचा भास प्रेक्षकांना होत असे. त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक मानाचे पुरस्कारही मिळाले आहेत. अखिल भारतीय नाट्य परिषदेने त्यांना जीवनगौरव पुरस्कार देऊन गौरवले आहे. १९९७ साली झालेल्या अखिल भारतीय नाट्य संमेलनाचे अध्यक्षपदही त्यांनी भूषवले आहे. एक छोटा माणूस या नावाने त्यांचे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले आहे. त्यांच्या निधनाने पाच दशकांहून काळ रंगभूमीची अविरत सेवा करणारा सच्चा रंगकर्मी काळाच्या पडद्याआड गेला आहे. जेष्ठ रंगकर्मी जयंत सावरकर यांना दुसऱ्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# जय जय महाराष्ट्र माझा...!

महाराष्ट्र ही संतांची, छत्रपती शिवरायांची, जिजाबाई, अहिल्याबाई, सावित्रीबाई,ताराबाई, यांची तसे महान सुधारकांची परंपरा असलेली पवित्र भूमी आहे. इथे कला संस्कृती साहित्य याचा गौरव होतो.

मंगल देशा पवित्र देशा महाराष्ट्र देशा किंवा बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय आमचा एक महाराष्ट्र देश हा.असे आपण अभिमानाने म्हणतो. जय जय महाराष्ट्र माझा गर्जा महाराष्ट्र माझा म्हणून महाराष्ट्राचा जयजयकार करतो.पण...

गेल्या काही वर्षात या महाराष्ट्रात राजकिय आणि सामाजिक क्षेत्रात एक प्रकारची अस्वस्थता निर्माण झाली आहे.राजकीय समीकरणे पार बदलून गेली. सत्तेच्या राजकारणामुळे तत्व धुळीला मिळाले आहेत. काल काय बोललो होतो आणि आज काय करत आहोत याचे भान नष्ट होत चालले आहे.बोलण्यात, कृतीत ताळमेळ नाही.बेताल आणि पातळी सोडून वागणे, बोलणे होत आहे. मग प्रश्न पडतो की आपण वर्णन करतो यातला महाराष्ट्र हरवत चालला आहे काय. ?

गेल्या वर्षीचे मनोज जरांगे पाटलांचे आरक्षण आंदोलनाने सारा महाराष्ट्र ढवळून निघाला. महाराष्ट्रभर त्याचे पडसाद उमटले संपत्तीचे नुकसान. झाले.अनेकांबद्दल पातळी सोडून बोलले गेले. त्यानंतर बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांचे निर्घृण हत्या प्रकरण. यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात अस्वस्थता आणि संताप व्यक्त केला गेला. हळहळ व्यक्त झाली. हे प्रकरण मागे पडत नाही तो पुण्यामध्ये वैशाली हगवणे हत्या आत्महत्या प्रकरण उघडकीला आले. ह्या प्रकारांवर फार मोठ्या प्रमाणावर समाजातून माध्यमातून चर्चा झाली आणि त्यातूनही परत अनेक गोष्टी समोर आल्या या प्रकरणांमध्ये राजकीय पाठबळ असल्याचेही बराच वेळा दाखवून दिले गेले.

संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मीक कराड आणि त्यासोबतच राजकीय वरदहस्त म्हणून धनंजय मुंडे यांचे नाव पुढे आले. त्यांना काही काळाने का होईना त्यांचे पदाचा राजीनामा द्यावा लागला. आमदार सुरेश धस यांनी हे प्रकरण लावून धरले. त्यातून ते कृषिमंत्री असताना फायदा घेऊन धनंजय मुंडे यांनी वेळोवेळी कसा भ्रष्टाचार केला हेही समोर आले.तर वर्तमानपत्रातून तो जनतेसमोर आणला गेला. धनंजय मुंडे कृषी मंत्री असताना अगदी बदली करायचे रेट कसे कसे होते वर्तमान पत्रात चार्टसहित प्रसिद्ध झाले आहे. ही बाब तर दुर्लक्षितच राहिली. त्याच्यावर मात्र काही चर्चा नाही. तरीही आता ते म्हणत आहेत माझ्या बीडच्या मातीला बदनाम करू नका.

निवडणुकीच्या आधी आश्वासन देणे हे तर राजकीय नेत्यांची कामच आहे. ज्याप्रमाणे आताही शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफी किंवा सातबारा उतारा कोरा करणे, विमा रकमा ताबडतोब मिळाल्याविषयी आश्वासन झाले, लाडक्या बहिणींना पंधराशे रुपये, शेतकऱ्यांना मानधन योजना, हे सर्व जर बघितले तर आता काही काळ लोटल्यानंतर ह्या आश्वासनाची किती पूर्तता झाली याविषयी लोकांमध्ये आता चुळबूळ सुरू झाली आहे. निवडणुकीच्या आधी लाडक्या बहिणीला सरसकट कुठलेही निकष न लावता येतील ते अर्ज मंजूर करून दिले गेले. परंतु आता त्याची मात्र छाननी सुरू झाली आणि आता त्यात सुधारणा करण्यात आली. वेगवेगळे निकष लावले जात आहे. कर्जमाफीचेही तसेच झाले. त्यासाठी पुन्हा एकदा महाराष्ट्र ढवळून निघाला.



बच्चू कडूंचे आंदोलन सुरू झाले आणि आता माफी घेतल्याशिवाय स्वस्त बसणार नाही असा त्यांनी चंगच बांधला. आता अधिवेशनात कर्जमाफी विषयी परत एकदा नवीन निकष लावून त्याचा निर्णय होईल, त्यालाही आता बराच कालावधी लागणार आहे. त्याच्याविषयी अजून स्पष्टपणे धोरण जाहीर होईल तेव्हा समजेल. फक्त गरीब शेतकऱ्यांनाच शेती कर्जमाफीचा फायदा मिळावा म्हणून काही निकष लावून माफी दिली जाईल असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. पण ज्यांनी कर्जफेड वेळेवर केली आहे त्यांना काय प्रोत्साहन दिल्या जाणार त्या बाबतीत कुठलाही निर्णय जाहीर झाला नाही.आम्ही वेळेवर पैसे भरतोही चूक करतो का ? असाही प्रश्न विचारला जातोय.

नुकतेच अधिवेशन पार पडले अधिवेशनामध्ये जनतेच्या असंख्य प्रकारच्या विषयी चर्चा होणे आवश्यक असते. परंतु अधिवेशन काळात अनेक गोष्टी अशा घडतात की महत्त्वाचे मुद्दे बाजूला राहतात आणि नाही त्या गोष्टीवर फोकस केला जातो अधिवेशन काळातही कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचे मोबाईलवर रमी खेळण्याविषयीचे वृत्त आणि व्हिडिओ प्रसिद्ध झाला. त्यामुळे परत एकदा हे अधिवेशनात आपले आमदार आणि मंत्री किती गंभीरपणे बघतात हे एकदा समोर आले. जनतेच्या प्रश्नाकडे किती गंभीरपणे या चर्चेत ते सहभागी होता हे दिसून आले त्याच काळात गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड या दोघांच्या कार्यकर्त्यांमध्ये विधानभवनात तुंबळ झाले. चित्रपट स्टाईल हाणामारी झाली. वास्तविक पाहता अधिवेशन काळात अशावेळी बाहेरच्या व्यक्तीला प्रवेश नको असे असताना सुद्धा बाहेरची व्यक्ती आत मध्ये प्रवेश करतात आणि ही परिस्थिती उद्भवते ही अतिशय गंभीर बाब आहे. पक्ष कोणताही असो परंतु त्यासाठी नियमावली ही एकच पाहिजे अधिवेशन काळात कृषिमंत्री मोबाईल बघत होते. त्या संदर्भात परत एकदा लातूरमध्ये कार्यकर्त्यांमध्ये राडा झाला. लातूरमध्ये सुनील तटकरे यांची पत्रकार परिषद सुरू असताना छावा संघटनेच्या काही कार्यकर्त्यांनी कृषी मंत्राच्या राजीनाम्याचे निवेदन देण्याविषयीचे गोष्टीमुळे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट आणि छावा संघटना यातही हाणामारी झाली. अनिल परब यांनी मंत्री योगेश कदम यांच्या आईच्या नावाने बार असल्याचे उघड केले.हनीट्रॅप प्रकरण गाजते आहे. म्हणजे महत्त्वाचे प्रश्न बाजूला राहतात आणि राजकीय नेत्यांच्या मंत्र्यांच्या या प्रकरणांमध्ये जास्त लक्ष घालावे लागते.अधिवेशनाचा अधिक वेळ खर्च होतो. अर्थात राजकीय नेते बराच वेळा कार्यकर्त्यांना अभय देत असल्यामुळे अशा गोष्टी घडतात असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

अधिवेशनात चर्चा बरोबरच पोलखोल प्रकरणे वाढत असल्याचे दिसून येत आहे.

निवडणूक आयोगाचे आकडेवारीनुसार विधानसभेत २८६ आमदारापैकी ११८ आमदारांवर गुन्हेगारी स्वरुपाचे खटले दाखल आहेत. राजकारणात गुन्हेगारी करण गंभीर बाब आहे.

राज्यात एकूण १०८००० जिल्हा परिषद मराठी शाळा असून अनेक शाळांमध्ये पटसंख्या ही २० पेक्षाही कमी आहे अशा अठरा हजार मराठी शाळा विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्यामुळे बंद होणार असलेली माहिती उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली आहे. एकीकडे आपण मराठी शाळा विषयी मराठी भाषेविषयी आग्रही असताना या शाळा बंद होणे तितकेच धोक्याचे आहे.त्याशाळा बंद होवू नये यासाठी प्रयत्न हवे. अशा परिस्थितीत इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडे पालकांचा आणि विद्यार्थ्यांचा कल वाढणार नाही तर नवलच. अशा शाळांमध्ये लाखाने फी आणि डोनेशन घेतले जाते. त्याविषयी पालकांमध्ये असंतोष आहे.त्या शाळांवर काहीच बंधन नाही का ? अशा खाजगी शाळावर काही बंधन, निमम घालणार का नाही.? काही शिक्षण संस्थांमध्ये आदिवासी विद्यार्थ्यांच्या संख्येत तफावत आढळली तर संस्थेने आपल्या बांधकामामध्ये कोट्यावधी रुपयाचा महसूल बुडवल्याचे उघड झाले आहे.बनावट कागदपत्रे, प्रवेश,शिक्के बनवून कागदपत्रे तयार करून शासनाची फसवणूक केली, त्याचेही चौकशी मागणी अधिवेशनात केली आहे.

स्त्रियांवरील अत्याचार हा तर नेहमीचाच विषय आहे. स्त्रिया- मुली गायब होणे तसेच जबरदस्तीतून धर्मातर करायला लावायचे घटना समोर येत आहे. याच्यावरही काहीतरी ठोस उपाय करणे आवश्यक असताना तिकडेही दुर्लक्ष होत आहे. शाळांमध्ये मुलींच्या स्वच्छतागृहामध्ये कॅमेरा लावून त्याचे चित्रीकरण करायची घटना मध्यंतरी घडल्या होत्या तर नुकतेच एका शाळेमध्ये मुलींच्या मासिक पाळीच्या विषयावरून मुलींना विवस्त्र करून पाळीची तपासणी केली. अशा अप्रिय घटना असंतोषाला कारणीभूत ठरणाऱ्या घटना घडत आहेत.महिला आयोगाने ही ह्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे.

त्रिभाषा वाद अजून मिटला नाही. त्यासाठी वेळोवेळी आंदोलनाचा पवित्रा घेतला जात आहे.

या सर्व गोष्टींचा विचार करता,

अधिवेशन काळात विधिमंडळ सभागृहात प्रवेशासाठी कडक धोरण अवलंविले जावे.

अधिवेशनात असंस्कृत, असंसदीय शब्दांचा वापर होवू नये. पातळी सोडून बोलू नये.

केवळ आरोपप्रत्यारोपात अधिवेशनाचा वेळ वाया घालवू नये. जनतेच्या प्रश्नावर, शेतकरी समस्या, बेरोजगारी, सरकारी योजनावर चर्चा होणे अपेक्षित आहे.

मोबाईल रमी प्रकरण चर्चा बघता अधिवेशन काळात सभागृहात मोबाईल वापरायला बंदी घालावी. आपण जनतेच्या भल्यासाठी ईथे आलेलो आहोत, याच भान ठेवायला हवे.

कारण या अधिवेशनावर शासनाचा,अर्थात जनतेचाच कोट्यावधी चा निधी, पैसा खर्च होत असतो. त्यातून काही निष्पन्न व्हायला हवे.

जेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणत आहे की,एकूणच घडणाऱ्या घटनावरुन,वागणूकीतून आमदारांना माज आलाय ही भावना कुठतरी जनतेमध्ये निर्माण होत आहे का.? हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न उपस्थित करुन सर्वानाच वागणूक व्यवस्थित ठेवण्यासाठी जाणिव करून दिली हे तितकेच महत्त्वाचे आहे.

अधिवेशनात पातळी सोडून बोलण,वागणे, आरोपप्रत्यारोप,प्रकरणांमधली पोलखोल हेच बघयला मिळते.

कुठेतरी ह्याचा विचार करायची वेळ आली आहे. त्यावर चिंतन होणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या महान परंपरेची आब राखा म्हणायची वेळ आली आहे.

**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव.**
**मोबा-८९९९५६६९१७**

## पान १ वरुन

### रमी सर्कल ...

अपशब्द वापरले आहेत., अधिवेशन चालू असताना रमी सर्कल खेळल्याने महाराष्ट्राची बदनामी झाली., त्यांचा राजीनामा घेतला नाही, तर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा., मुख्यमंत्र्यांनी तत्काळ निर्णय घ्यावा, अन्यथा शरद पवार गट रस्त्यावर उतरेल.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) जिल्हाध्यक्ष निसार देशमुख, प्रदेश सरचिटणीस नंदकुमार देशमुख, नंदकिशोर जांगडे, युवक शहराध्यक्ष राजेंद्र जाधव, कैलास मगरे, मुन्ना दायमा, खान आमेर पाशा, शेख फारुख, दिलीप भुतेकर, भरत कदम, रशिद मोमीन, सोपान पाडमुख, सुर्यकांत मोताळे, गणेश बर्वे, फहाद चाऊस, आवेश खान, श्रीमंत जऱ्हाड, सतीश उबाळे, सुभाष जगताप, देवराव गायकवाड, धनंजय देशमुख, डॉ. सय्यद लाल, संदीप नरवडे, श्रीराम जाधव आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सोशल मीडियावर रमी सर्कलचा मंत्र्यांचा व्हिडिओ मोठ्या प्रमाणावर व्हायरल झाला असून, विरोधी पक्षांनी त्याला राज्य सरकारच्या शिस्तशीर प्रशासनावर प्रश्नचिन्ह ठरवले आहे.

### महावितरणच्या ...

टाळण्यासाठी वीजतारांची नियमित तपासणी आणि देखभाल यंत्रणा मजबूत करण्याचे निर्देश दिले. लोणीकर यांनी भालेकर कुटुंबाला तात्काळ आर्थिक नुकसानभरपाई आणि आवश्यक आधार देण्याची मागणीही केली होती.

आज, दिनांक २३ जुलै २०२५ रोजी, बुधवारी, आमदार बबनराव लोणीकर यांनी परतूर येथील भालेकर कुटुंबाच्या निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला. या भेटीत त्यांनी कुटुंबाच्या दुखात सहभागी होताना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे आश्वासन दिले. या दुखद प्रसंगी कुटुंबाला आधार देण्यासाठी त्यांनी तात्काळ प्रशासकीय पावले उचलली.

भेटीदरम्यान, लोणीकर यांनी महावितरणच्या अधीक्षक अभियंत्यांशी फोनवर संपर्क साधून भालेकर कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत देण्याच्या सूचना दिल्या. तसेच, या प्रकरणात दोषी असलेल्या महावितरणच्या उपअभियंत्याला तात्काळ निलंबित करण्याचे आश्वासन दिले. यामुळे दोषींवर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

याशिवाय, लोणीकर यांनी उपविभागीय कृषी अधिकारी राम रोडगे यांच्याशी संपर्क साधून भालेकर कुटुंबाला स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे अपघात विमा योजनेचा लाभ तातडीने मिळवून देण्याचे निर्देश दिले. या योजनेच्या माध्यमातून कुटुंबाला आर्थिक आधार मिळण्यास मदत होईल.

आमदार बबनराव लोणीकर यांनी या घटनेची गंभीर दखल घेताना महावितरणच्या निष्काळजीपणावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले, ही अत्यंत दुखद आणि गंभीर घटना आहे. महावितरणच्या निष्काळजीपणामुळे एका शेतकऱ्याचा बळी गेला आहे. दोषी कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे. शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी यापुढे अशा दुर्घटना टाळण्यासाठी सर्व यंत्रणांनी जबाबदारीने काम करावे. त्यांनी या प्रकरणाचा पारदर्शक तपास होऊन दोषींवर कठोर कारवाई होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

ही घटना महावितरणच्या कार्यप्रणालीतील त्रुटी आणि शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेकडे होणारे दुर्लक्ष अधोरेखित करते. ग्रामीण भागात वीजतारांची दुरवस्था आणि देखभालीचा अभाव यामुळे शेतकऱ्यांचा जीव धोक्यात येत आहे. लोणीकर यांनी यंत्रणांना शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आणि वीजतारांची नियमित तपासणी करून देखभाल यंत्रणा सक्षम करण्याचे आवाहन केले आहे.

आमदार बबनराव लोणीकर यांच्या तात्काळ हस्तक्षेपामुळे भालेकर कुटुंबाला आर्थिक आणि भावनिक आधार मिळण्यास मदत होत आहे. त्यांच्या या प्रयत्नांमुळे दोषींवर कारवाईचा मार्ग मोकळा झाला असून, शेतकऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रशासकीय यंत्रणा अधिक सतर्क होण्याची अपेक्षा आहे. भालेकर कुटुंबाला न्याय मिळवून देण्यासाठी आणि अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी लोणीकर यांचे प्रयत्न सुरू आहेत.

या प्रसंगी विश्वजीत दादा खरात, भाजपा परतूर तालुका अध्यक्ष शत्रुघ्न कणसे, शहर अध्यक्ष प्रवीण सातोनकर, नगरसेवक प्रकाश चव्हाण, ॲड. सुरेश काळे, सावता काळे, संभाजी घनवट, युवा मोर्चा शहर अध्यक्ष अर्जुन जगताप,नामदेव गोरे, सतीश सोनवणे यांच्या सह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

### नियम डावलून ...

सर्वच नियम डावलून निवडणूक पार पाडली. आर्थिक देवाणघेवाण झाल्याचा संशय असून, या अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांची जंगम मालमत्ता जप्त करावी. अन्यथा आम्ही न्यायालयात दाद मागणार आहोत.

**मागणी**: निवडणूक रद्द करावी, संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन करावे, चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती गठीत करावी, नव्याने पारदर्शक निवडणूक घेण्यात यावी,

ही घटना सहकार संस्थांतील पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे करणारी असून, प्रशासनाने याची तात्काळ दखल घेणे गरजेचे आहे.

### पंडीत दिनदयाळ ...

जालना येथील एकुण १२ नियोक्ते उपस्थित होते यामध्ये ६७ पुरुष व ८ महिला असे एकुण ७५ उमेदवारांची प्राथमिक निवड झाली. तसेच या मेळाव्यात शासनाच्या जिल्हास्तरावरील विविध महामंडळे यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या प्रसंगी स्वयंरोजगाराबाबत अर्थसहाय्य करणाऱ्या विविध शासकीय महामंडळाचे स्टॉल लावण्यात आले, यामध्ये शासनाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते अण्णासाहेब पाटील अर्थिक मागास विकास महामंडळाच्या वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजनेअंतर्गत ८ लाभार्थ्यांना ट्रॅक्टरचे वितरण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भोकरदन विधानसभा सदस्य आ. संतोष दानवे उपस्थित होते. यावेळी मंचावर जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर, भुजंग रिठे व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भगवान डोंगरे यांची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यास परीसरातील विविध मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता विभागाचे सहायक आयुक्त गणेश चिमणकर यांनी केले.

या रोजगार मेळाव्याच्या यशस्वीवेतसाठी अमोल बोरकर, आत्माराम दळवी, डॉ. अमोल परिहार, प्रदीप डोळे, रवि पाडमुख, विशाल जगरवाल, उमेश कोल्हे, दिनेश उढाण, सोमेश्वर शिंदे, अमर तुपे, दिपक पालवे यांनी परीश्रम घेतले. तसेच या कार्यक्रमास मोरेश्वर महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापक यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. गोवर्धन मुळक यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्राचार्य डॉ. भगवान डोंगरे यांनी केले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त काळुंका माता मंदिरात महाआरती



**जालना । प्रतिनिधी** - राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त जालना शहरातील गांधी चमन परिसरातील कळुका माता मंदिरात महाआरती व फळवाटपाचा कार्यक्रम मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाचे आयोजन जालना बहुभाषिक ब्राह्मण समाजाच्या वतीने करण्यात आले होते.

कार्यक्रमानंतर बोलताना आयोजकांनी सांगितले की, मुख्यमंत्री फडणवीस यांनी सर्व समाजघटकांचा समावेश करून राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी भरीव कार्य केले आहे. त्यांच्या दीर्घायुष्याची प्रार्थना करत हा धार्मिक उपक्रम राबवण्यात आला.

यावेळी प्रदेशाध्यक्ष, बहुभाषिक ब्राह्मण महासंघाचे सुरेश मुळे, समन्वयक महेश भालेराव, दीपक रणनवरे, मधुसूदन दंडारे, प्रसाद पाटील, अमोल भाले, गजानन कुलकर्णी, नितीन दडनाईक, दिलीप देशपांडे, संतोष दाणी, महेश वझरकर, संजय जोशी, पवन देशमुख, सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे, संगम ुळे महाराज व इतर भक्तजण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमानंतर भक्तांना फळवाटप करण्यात आले व मुख्यमंत्री फडणवीस यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. भक्तिमय वातावरणात संपूर्ण मंदिर परिसर मंत्रोच्चार, टाळ, मृदंग आणि उत्सवाच्या रंगाने भारावून गेला होता.

# दिव्यांगांना जागा आणि घरकुल द्या; शिवसेना दिव्यांग आघाडीचे निवेदन

### दिव्यांगांवर अन्याय सहन केला जाणार नाही, घरकुल न दिल्यास मोर्चा काढण्याचा इशारा

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यातील दिव्यांग नागरिकांना घरकुल व भूखंड उपलब्ध करून द्यावेत, या मागणीसाठी शिवसेना दिव्यांग आघाडीने निवासी जिल्हाधिकारी गणेश म ांडलिक यांना निवेदन दिले. ही मागणी पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देखील यावेळी देण्यात आला. दिनांक २२ जुलै रोजी जालना महानगरपालिकेत दिव्यांग नागरिकांनी ठिय्या आंदोलन केले होते. त्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त आयुक्त नंदा गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली सकल दिव्यांग सामाजिक संघटनांची बैठक घेण्यात आली. या बैठकीत काही आश्वासने देण्यात आली, मात्र दिव्यांगांनी सम ाधान न झाल्यामुळे त्यांनी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून अधिकृत निवेदन सादर केले.

यावेळी निवासी जिल्हाधिकारी गणेश मांडलिक यांनी महानगरपालिका, सम ाजकल्याण विभाग आणि विविध दिव्यांग संघटनांसोबत संयुक्त बैठक बोलावण्याचे आश्वासन दिले.



निवेदनावर शंकर शिरगुळे, संस्थापक अध्यक्ष, सकल दिव्यांग सामाजिक संघटना, राहुल मुळे जिल्हाध्यक्ष, सकल दिव्यांग संघटना, अनिल म गदूले - जिल्हाध्यक्ष, शिवसेना दिव्यांग आघाडी, सतीश पतपुरे - जिल्हाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस दिव्यांग सेल, तसेच जगदीश सातपुते, अशोक बोचरे, सविता बोराडे, सुरेश बोर्डे, विक्रम पुंगळे, रेणुका वाहुळकर, शेख इस्माईल, राजेश काविटी, रंगनाथ शिंदे, गोविंद चिखले, प्रकाश एडके आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## घुसखोरी करणारी ६ बांगलादेशी नागरिक ताब्यात

**पुणे** - भारतात घुसखोरी करुन अनधिकृतरीत्या राहणाऱ्या ६ बांगलादेशी नागरिकांना पिंपरी चिंचवड शहर पोलिसांच्या गुन्हे शाखा क्रमांक चार पोलिस पथकाने बेड्या ठोकल्या आहेत. पिंपरी चिंचवड शहरात राहणारे काही बांगलादेशी नागरिक वाकड येथील भुजबळ चौक इथून मुंबईच्या दिशेने जाणार असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शाखा क्रमांक चार पोलीस पथकाला मिळाली होती.

# दिव्यांगांच्या मागण्यांसाठी ठिय्या आंदोलन

### घरकुल, जागा, गाळे, कर सवलत व सुविधा देण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी** - दिव्यांग नागरिकांच्या विविध मागण्यांसाठी जालना महानगरपालिकेत शिवसेना शहर प्रमुख विष्णू भाऊ पाचफ ुले यांच्या नेतृत्वाखाली दिव्यांग नागरिकांनी ठिय्या आंदोलन केले. या आंदोलनात विविध मागण्या महानगरपालिका आयुक्त संतोष खांडेकर यांच्याकडे अधिकृतपणे मांडण्यात आल्या.



मुख्य मागण्या पुढीलप्रमाणे: घरकुल व जागा उपलब्ध करून द्याव्यात, मस्तगड परिसरात दिव्यांग पुनर्वसन केंद्र स्थापन करावे, दिव्यांगांना व्यवसायासाठी गाळे उपलब्ध करून द्यावेत, पाणीपट्टी व नळपट्टी करामध्ये ५०% सवलत द्यावी, महानगरपालिकेत दिव्यांग विभाग तळमजल्यावर हलवावा, व्हीलचेअरची उपलब्धता सुनिश्चित करावी

या आंदोलनानंतर उपयुक्त अधिकाऱ्यांसह बैठक उपायुक्त नंदा गायकवाड यांच्या कार्यालयात घेण्यात आली. यामध्ये अधीक्षक विजय फ ुलंब्रीकर, उप आयुक्त नंदा गायकवाड, सहाय्यक आयुक्त अनुराधा नागोरी, दिव्यांग विभागाचे प्रतिनिधी, आणि सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे पदाधिकारी सहभागी झाले होते. भंडार विभागाला व्हीलचेअर उपलब्धतेसाठी अधिकृत पत्र दिले गेले असल्याची माहिती बैठकीत देण्यात आली. याशिवाय, दिव्यांग घरकुल देण्यासाठी ठराव करून पुढील कार्यवाही केली जाईल, असे आयुक्त संतोष खांडेकर यांनी शिवसेना शहरप्रमुख पाचफुले यांना आश्वासन दिले. यावेळी शंकर शिरगुळे, राहुल मुळे, अनिल मगदुले, सुरेश बोर्डे, बाळू आगलावे, प्रकाश एडके, जगदीश सातपुते, सविता बोराडे, इस्माईल शेख, राजेश कावेटी, विक्रम पुंगळे, शेख रशीद, अंकुश वाकचौरे, मिनाबाई काळबांडे, इत्यादींची उपस्थिती होती. आमदार अर्जुन खोतकर यांनीही विधानसभेत दिव्यांगांच्या प्रश्नांची ठामपणे मांडणी केली असल्याची माहिती देण्यात आली.

# सुश्रद्धा सोशल वेल्फेअर फाऊंडेशनच्यावतीने भिख्खू संघाला जीवनावश्यक अन्नधान्य वस्तूंचा पुरवठा

**बोरघर । माणगांव । प्रतिनिधी** - श्रद्धा शील संपन्न धम्म उपासक, अनाथपिंडक गौरव पुरस्कार सन्मानित व सम्राट अशोक गौरव पुरस्कार सन्मानित सद्धम्मप्रिय महा दानशूर व्यक्तीमत्व, यशस्वी उद्योजक सुश्रद्धा सोशल वेल्फ ेअर फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष सुशांत नामदेव मोरे यांच्यावतीने भिक्खू संघाला जीवनावश्यक अन्नधान्य वस्तूंचा पुरवठा ( तीन म हिन्यांचा किराणा सामान ) दान करण्यात आला.

भगवान गौतम बुद्धांच्या करुणामय धम्माचे अनुकरण करीत, तसेच भिक्खू संघाची सेवा हीच सर्वोच्च पुण्यकर्म आहे या भावनेतून सुश्रद्धा सोशल वेल्फेअर फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष, श्रद्धा शील संपन्न उपासक, महा दानी, महा दानशूर व्यक्तीम त्व सद्धम्मप्रिय सुशांत मोरे यांनी आपल्या श्रद्धेने प्रेरित होऊन भिक्खू संघाच्या वर्षावास काळासाठी तीन महिन्यांचा किराणा सामान, तथा जीवनावश्यक अन्नधान्य वस्तूंचा पुरवठा अत्यंत निष्ठेने आणि श्रद्धापूर्वक भक्तीभावाने अर्पण केला आहे.



सद्धम्मप्रिय सुशांत नामदेव मोरे यांनी भिख्खू संघाला दिलेले हे दान ऐतिहासिक महा दानशूर व्यक्तीमत्व अनाथपिंडक यांची आठवण करून देणारे असून,धम्मकार्याच्या सेवेसाठी एक मौल्यवान योगदान आहे. त्यांच्या या कृतीतून इतर श्रद्धावान उपासक व उपासिकांना प्रेरणा मि ळेल,असा विश्वास आम्ही व्यक्त करतो असे भिख्खू संघाने हे दान स्वीकारताना म्हटले आहे. भवतु सब्बमंगल, सुखीता होंतु भिक्खू संघ धम्मसेवेचे दीप असेच तेवत राहो।

## मस्तगड रोडवर मुक्या जनावरांचे ठिय्या आंदोलन!

**जालना । प्रतिनिधी** - शहरातील मस्तगड परिसरात नेहेमीप्रमाणेच मंगळवार (दि २२) रोजी अनेक गायी व बैलांनी थेट रस्त्याच्या म ध्यभागी ठिय्या देत वाहतूक व्यवस्था कोलमडवून टाकली. वाहनचालक व रहदारी करणाऱ्या नागरिकांना यामुळे मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागले. सदर दृश्य पाहून असे वाटत होते की, जनावरांनी जणू प्रशासनाच्या उदासीनतेविरोधात मौन आंदोलन छेडले आहे! स्थानिक नागरिकांनी यावर तीव्र नाराजी व्यक्त करत सांगितले की, दररोज या भागात भटक्या जनावरांची समस्या वाढत चालली आहे. ना त्यांचे व्यवस्थापन, ना नियंत्रण.

अपघाताची शक्यता वाढत असून, अनेक वेळा वाहनचालक अपघाताच्या उंबरठ्यावर पोहोचतात, मात्र प्रशासन अजूनही झोपेत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. महानगरपालिकेच्या वतीने त्वरित पावले उचलावी. तसेच रस्त्यांची स्वच्छता आणि वाहतुकीची अडथळे दूर करावेत, अशी मागणी आता जोर धरत आहे.



# चिंचखेड व परिसरात अतिवृष्टी; पिके वाहुन गेली, पंचनाम्याची मागणी

**अंबड । प्रतिनिधी** - तालुक्यातील जामखेड मंडळातील चिंचखेड, राहुवाडी, झोडेगाव येथे अतिवृष्टीप्रमाणे पाऊस पडल्याने जिकडे तिकडे पाणीच पाणी झाले. अचानक पडलेल्या या पावसाने अनेक शेतकऱ्यांच्या शेतातील पिके वाहुन गेली असुन तहसीलदार विजय चव्हाण यांनी तातडीने पंचनामा करण्याची मागणी जोर धरत आहे. जामखेड येथील पर्जन्यमान यंत्र असलेल्या ठिकाणी पावसाचे प्रमाण कमी आहे मात्र इतर ठिकाणी अतिवृष्टी झालेली पहायला मिळते. चिचंखेड येथील शेतकरी चंद्रशेखर मोहरीर यांच्या शेतातील सोयाबीन तर बाबासाहेब गोल्टे यांच्या शेतातील तुरीचे पीक वाहून गेले आहे. चिचंखेड गावातील अण्णासाहेब पैठणे, आनंद पैठणे, संभाजी गोल्डे, गजानन मोहरीर, संतोष जिरेकर, महेश पैठणे, बप्पा शिंगाडे, नारायण शिंगाडे, बाळू म गरे, भगवान मुळे, कैलास काळे, प्रशांत पैठणे, सचिन जोशी, परसराम खरे आदी शेतकऱ्यांचे नुकसान झाले असुन झालेल्या नुकसानीचा पंचनामा करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी यांना बांधावर पाठवण्याची मागणी जोर धरीत आहे.



## कार्यालय नगर पंचायत, बदनापूर

जा.क्र.२०२५/नपंब/कावि-
नगर पंचायत बदनापूर
दिनांक २२/०७/२०२५

### जाहीर प्रगटन

**विषय : स.न./गट क्रं. प्लॉट नं वार्ड क्र ९ घर क्रं. ३३१/१ चे हस्तांतरण संबंधी**

सर्व जनतेस कळविण्यात येते की, श्रीमती शबाना शेख शाहनवाज राहणार बदनापूर यांनी स.न/गट क्रं... प्लॉट नं... वार्ड क्रं. ०९ घर क्रं. ३३१/१ श्री सय्यद हाशम सैय्यद म. हुसेन यांच्या नावावर आहे. व ते न्यायालयीन तडजोड आधारे नामांतर करिता अर्ज दिला आहे.

तरी त्याबाबत कोणास काही आक्षेप तक्रार असल्यास या जाहीरनाम्याच्या तारखेपासून सात (७) दिवसांच्या आत या कार्यालयाकडे मालकी कागदपत्रासह लेखी अर्ज दाखल करावा नसता मुदत संपल्यानंतर काहीही तक्रार अथवा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही व प्रकरणात रितसर कार्यवाही करण्यात येईल.

**घराची चतुःसिमा खालील प्रमाणे :**
पुर्व : निहालचंद कटारिया
पश्चिम : सरकारी रस्ता
दक्षिण : निहाचंद कटारिया
उत्तर : सरकारी रस्ता

**स्वाक्षरीत**
**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत बदनापूर**

## दर्शन रांगेतील भ्रष्टाचार प्रकरणी व्यवस्थापक सक्तीच्या रजेवर

**पंढरपूर । प्रतिनिधी** - यावर्षीच्या आषाढी वारीनिमित्त पंढरपूर नगरी लाखो वारकऱ्यांनी फुलून गेली होती. दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी प्रशासनाने उत्तम नियोजन केले होते. मात्र, या नियोजनातच भ्रष्टाचाराच्या आरोपांनी वाद निर्माण केला आहे.

दर्शन रांगेतील मंडप उभारणीच्या ठेकेदाराकडून आर्थिक व्यवहार झाल्याच्या आरोपावरून मंदिर समितीच्या व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांना सक्तीच्या रजेवर पाठवण्यात आले आहे. विशेष म्हणजे, आजच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी श्री विठ्ठल-रूक्मिणीचे दर्शन घेतले आणि त्यानंतर काही तासांतच ही कारवाई झाली आहे.

भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी केलेल्या चांगल्या नियोजनावर हे भ्रष्टाचाराचे सावट पडल्याने मंदिर समितीच्या विश्वसनियतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दीपसन रेमेडी
http://exclusivemaharashtra.com/
https://www.lokadhikarlive.com/
https://arjunastra.in/
◆ वृत्तपत्रे (दैनिक, साप्ताहिक) पेज सेटींग
◆ वेब पोर्टल, युट्युब चॅनल
◆ वृत्तपत्रांचे वार्षिक विवरण
◆ नविन शिर्षक (वृत्तपत्र) नोंदणी ऑनलाईन अर्ज
◆ वृत्तपत्रांशी निगडीत सर्व प्रश्नांचे अल्पदरात उपाय
वृत्तपत्र, वेब पोर्टल नोंदणी संदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
अधिस्विकृती पत्रिकेसंदर्भात संपूर्ण मार्गदर्शन
वृत्तपत्र शासनमान्य यादीत समाविष्ट करण्यासाठी मार्गदर्शन
◆ 9975387225 ◆ 8390098886

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा जालना महानगर मंडळातील जालना ग्रामीण व पूर्व जालना मंडळात रक्तदान शिबीर

**जालना । प्रतिनिधी -** महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री मा.ना.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा जालना महानगर मंडळातील जालना ग्रामीण व पूर्व जालना मंडळाच्या वतीने महा रक्तदान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला नागरिक, कार्यकर्ते आणि युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला हे रक्तदान शिबीर जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या नेतृत्वात संपन्न झाले.

भाजप महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी विशेष उपस्थिती लावून मार्गदर्शन केले. त्यांनी रक्तदानाच्या सामाजिक, वैद्यकीय आणि मानवीदृष्ट्या असलेल्या गरजेवर सविस्तर भाष्य केले. सामाजिक बांधिलकी जपत महाराष्ट्र राज्याचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचा वाढदिवस रक्तदानाच्या माध्यमातून साजरा केला जात आहे, हे निश्चितच प्रेरणादायी आहे. रक्तदान ही सर्वश्रेष्ठ सेवा आहे. आपल्या थोड्याशा योगदानातून एखाद्याचे संपूर्ण आयुष्य वाचू शकते. आजच्या तरुणांनी अशा उपक्रमात केवळ सहभाग नाही तर पुढाकारही घेतला पाहिजे, असे आवाहन त्यांनी उपस्थित कार्यकर्ते व युवकांना केले. ते पुढे म्हणाले की, पक्षाच्या सामाजिक बांधिलकीचा भाग म्हणून अशा उपक्रमांचे आयोजन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. कार्यकर्त्यांनी जनतेशी अधिक जवळून नातं जपण्यासाठी समाजोपयोगी कार्यात पुढे यावं असेही त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपा जालना तालुकाध्यक्ष संजय डोंगरे यांनी सांगितले की, या रक्तदान शिबिरामागे केवळ वाढदिवस साजरा करणे हा हेतू नसून समाजासाठी काहीतरी मोलाचे देण्याची भावना आहे. प्रत्येक कार्यकर्त्याने अशा सामाजिक उपक्रमात पुढाकार घेणे ही काळाची गरज आहे.

पूर्व जालना मंडळ अध्यक्ष अमोल धानुरे यांनीही आपले विचार मांडले. ते म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस समाजोपयोगी कार्यातून साजरा होणं हे नव्या पिढीसाठी प्रेरणादायी आहे. अशा उपक्रमातून कार्यकर्त्यांमध्ये सेवा, समर्पण आणि संघटनशक्ती यांचा विकास होतो.

यावेळी ग्रामीण मंडळात कार्यक्रमाचे संयोजक डॉ. अनिल सरकटे, विष्णु दादा भूतेकर, काकासाहेब घुले, पुंजाराम भूतेकर, कैलास उबाळे, मुकेश चव्हाण, संजय जाधव, राजाराम (राजे) जाधव, सतीश केरकळ, नागेश अंभोरे, गजानन खरात, बद्रीनाथ भसांडे, दौलत भुतेकर, विष्णु डोंगरे, दत्ता जाधव, ज्ञानेश्वर राठोड, विजय मोहिते, तुकाराम कळकुंबे, नारायण मोहिते, कृष्णा गायके, गोपाल चौधरी, गोवर्धन कोल्हे, देविदास देशमुख, राजेश जोशी आदींची उपस्थिती होती. यावेळी दिगंबर भानुदास भुतेकर, गौतम तुळशीराम सरकटे, अनिल सदाशिव सरकटे, गणेश नारायण भुतेकर, दिगंबर सदाशिव भुतेकर, राजाराम एकनाथ जाधव, विठ्ठल सुभाषराव डोंगरे, अंकुश नंदू राठोड, बाबासाहेब रामेश्वर सरकटे, योगेश देविदास जोगदंड, रामेश्वर संतोष कुदळे, गौतम एकनाथ सरकटे, शेख शकील शेख कासम, ज्ञानेश्वर भीमराव राठोड, उमेश शांताराम सपकाळ, समाधान हनुमंतराव शिंदे, सचिन प्रेमदास राठोड, विलास विष्णु शिंदे, दामोदर ज्ञानदेव पोटरे, विनायक जनार्दन उगले, बद्रीनारायण विठ्ठल बसांडे, काशीराम केशव राठोड, शाहरुख छोटू मिया शेख, शिवाजी रोहिदास राठोड, गोपाल शेषराव चौधरी, राजाभाऊ विनायक कळकुंबे, सचिन प्रभाकर सरकटे, संतोष येडूबा सरकटे, दिनकर नारायण सरकटे, विलास मारोतराव भुतेकर, प्रफुल कृष्णाराव शिंदे, हरी अशोक शिंदे, ऋषिकेश विष्णु शिंदे, आकाश शिवाजी भालसिंग, सुनील गंगाधर बोटुळे, गोविंद अर्जुन चौरे, सचिन मोहन चव्हाण, विनोद सोपान डोंगरे, बाळासाहेब हिम्मतराव डोंगरे, नागेश विष्णू अंभोरे, मधुकर छोटू पवार, सुभाष देवीचंद राठोड, अमोल गोविंदराव खरात, कृष्णा पंडितराव कावळे, चंद्रकांत देविदास शिंदे, रामेश्वर भोपा पवार, जनार्दन बाबासाहेब शिंदे, रावसाहेब सुखदेव शिंदे, विलास रमेश चव्हाण, नारायण लक्ष्मण जाधव, रामेश्वर उद्धवराव डोंगरे, प्रभाकर अंबादास शिंदे, संदीप रामकिसन शिंदे, लहू पंडितराव जाधव, राहुल परसराम काळे, गोविंद विजय खरात, रामदास एकनाथ अंभोरे, हरी सर्जेराव शिंदे, दत्ता देविदास जाधव, ज्ञानेश्वर राजेंद्र मोहिते, गंगाधर विठोबा भुतेकर, अमोल देविदास राठोड, विलास गणेश मोहिते, आकाश अंबादास खरात, रामेश्वर भिकाजी सरकटे, विजय मनोहर मोहिते, नारायण किसन मोहिते, सुभाष बबन गायकवाड, सुधाकर नारायण सरकटे, विजय जाधव, गणेश राव निवृत्ती जाधव, अनिस शेख शब्बीर शेख, संजय एकनाथ डोंगरे, अर्जुन कैलास झारखंडे, युवराज भाऊसाहेब काकडे, माधव सारंगधर साबळे, शेख समीर शेख वजीत, अनिल अशोकराव शिंदे, राहुल सखाराम आटोळे, भरत रावसाहेब शिंदे, लक्ष्मण रंगनाथ जाधव, विकास नबाजी लाखे, शुभम रामेश्वर गायकवाड, सोमनाथ सुरेशराव सवणे, शकील नवाब पठाण, संजय पोमा जाधव, सुमित लक्ष्मणराव सोळुंके, वसंत माधवराव शिंदे, भागवत केशवराव भुतेकर, रवी सिद्धेश्वर घुले, बाबासाहेब मारुतीराव भुतेकर, परशुराम वैजनाथ घुले, गणेश शांताराम सपकाळ, गजानन भानुदास कुदळे, अनिल सुखदेव वाघ, बाबासाहेब दत्ता भुतेकर, कैलास सदाशिव भुतेकर, सतीश नानासाहेब गवारे, रितेश पुंजाराम भुतेकर, गणेश रामदास भुतेकर, दीपक कारभारी साळवे, प्रल्हाद बाबासाहेब सुरवसे, नितेश बबन बर्डे, दिपक राजू भुतेकर, अजय समाधान गवई, नारायण देविदास शिंदे, चक्रधर अर्जुन डोंगरे, शरद ज्ञानेश्वर सोनवणे आदींनी रक्तदान केले.

पूर्व जालना मंडळात संयोजक रणजीत रडला, सोपान पेंढारकर, सिद्धिविनायक मुळे, रवींद्र अग्रवाल, राजू गवई, श्याम उगले, सखुबाई पणबिसरे, गुलाब पणबिसरे, संतोष पांढरे, राजेंद्र भोसले, सिद्धेश्वर हजबे, शिवराज जाधव, सिद्धार्थ संचेती आदींची उपस्थिती होती. यावेळी संतोष विश्वनाथ पांढरे, अजय रावसाहेब कोल्हे, ऋत्विक विजय देवडे, अविनाश आकाश जाधव, कपिल अशोक मिसाळ, ओमकार प्रकाश मुळे, सतीश सुरेशराव राऊत, विष्णू विठ्ठल पडोळ, रवी काशिनाथ जाटवे, बाळकृष्ण नरसाआप्पा लोला, विकी सुरेश मोरे, शुभम मदन काळे, नरेश शेषपाल भुसार, भगवान हरिचंद्र झारकंडे, पवन एकनाथ वानखेडे, विनायक मुरलीधर शिंदे, सकलादी गजानन बकाल, भागवत फकीरबा जोशी, दीपक भगवान जाधव, अजय बबन निकाळजे, कृष्णा विष्णू कापसे, संतोष अंबादास चापलवाड, रोहित नगीनासिंग राजपूत, शिवलाल हिरालाल मुंगसे, प्रकाश राधेशाम दायमा, दीपक कैलास मेहेत्रे, संतोष विष्णू गळकर, गणेश महादू घारे, कल्याण सुरेश शिंदे, गणेश संजय पवार, मनोहर श्रीकृष्ण काळे, योगेश कैलास पवार, दीपक कैलास पितळे, मंगेश गुलाब सरदार, युवराज संजय गाटोळे, अभिजीत शिवाजी भालेराव, विक्रम बंडू राठोड, दिलीप कबकुटे, दीपक जगधने, शंकर बनसोडे, राजेश प्रकाश हस्तक, रणजीत राजपाल रीडला, गजानन सदाशिव घोडके, सोनू राजपाल बहोते, महेश माणिक पंगुडवाले, माणिक श्यामआप्पा खताडे, अनिलकुमार तुळशीराम घारे, आकाश तुकाराम बुजाड, आकाश शिवलाल मिटकर, कार्तिक वैजनाथ राऊत, धीरज सुनील राऊत, रोहन ज्ञानोबा हाके, मंदार प्रवीण पवार, सचिन धर्मराज त्रिपाठी, मंगलदास जगन्नाथ बागुल, सचिन कैलास राजगुरे, अक्षय सूर्यकांत पवार, राजू विनायक गवई, अथर्व सतीश कांबळे, ओमकार सुरेश दळे, प्रितेश मोहन खांडेभराड, ऋषिकेश कैलास घुले आदींनी रक्तदान केले. शिबिरात संकलित झालेले रक्त जनकल्याण रक्तपेढी, जालना यांच्या सहकार्याने संकलित करण्यात आले.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.